ॐ

शाहिर वसन्तराय

(स्वकृत शाहिरी पोवाडे संग्रह)

वसन्त ठाकर
नानिवडेकर
१/१८ गोरेगांवकर चाळ,
सेण्ट्रल-प्लाझा सिनेमाजवळ,
गिरगांव, मुम्बई ४००००४
(दूरभाष: २३८५८०९९)

ही हस्तलिखित वही कुणाला मिळाली तर वरील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी अथवा वर दिलेल्या दूरभाष क्रमांकावर कळवावे ही विनंती.

शाहिर वसन्तराय
(नानिवडेकर)

| AUGUST | SEPTEMBER | OCTOBER | NOVEMBER | DECEMBER | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | MON |
| 2 | | | 1 | | TUE |
| 3 | | | 2 | | WED |
| 4 | 1 | | 3 | 1 | THU |
| 5 | 2 | | 4 | 2 | FRI |
| 6 | 3 | | 5 | 3 | SAT |
| 7 | 4 | 2 | 6 | 4 | SUN |
| 8 | 5 | 3 | 7 | 5 | MON |
| 9 | 6 | 4 | 8 | 6 | TUE |
| 10 | 7 | 5 | 9 | 7 | WED |
| 11 | 8 | 6 | 10 | 8 | THU |
| 12 | 9 | 7 | 11 | 9 | FRI |
| 13 | 10 | 8 | 12 | 10 | SAT |
| 14 | 11 | 9 | 13 | 11 | SUN |
| 15 | 12 | 10 | 14 | 12 | MON |
| 16 | 13 | 11 | 15 | 13 | TUE |
| 17 | 14 | 12 | 16 | 14 | WED |
| 18 | 15 | 13 | 17 | 15 | THU |
| 19 | 16 | 14 | 18 | 16 | FRI |
| 20 | 17 | 15 | 19 | 17 | SAT |
| 21 | 18 | 16 | 20 | 18 | SUN |
| 22 | 19 | 17 | 21 | 19 | MON |
| 23 | 20 | 18 | 22 | 20 | TUE |
| 24 | 21 | 19 | 23 | 21 | WED |
| 25 | 22 | 20 | 24 | 22 | THU |
| 26 | 23 | 21 | 25 | 23 | FRI |
| 27 | 24 | 22 | 26 | 24 | SAT |
| 28 | 25 | 23 | 27 | 25 | SUN |
| 29 | 26 | 24 | 28 | 26 | MON |
| 30 | 27 | 25 | 29 | 27 | TUE |
| 31 | 28 | 26 | 30 | 28 | WED |
| | 29 | 27 | | 29 | THU |

mportant works | appointments | phones to make

॥ श्री: ॥

॥ ॐ ॥

卐

# पोवाडे

— शाहीर वसन्तराय
शंकर नागिवेडकर
(गुरु शाहीर कै. म.ना.
नागिवेडकर - शिष्य)

1988
JANUARY
1
FRIDAY
(१)

## १ — सणांची दुर्दशा (पोवाडा)

कितिक दिले अलौकिक सण । हिंदुधर्मानें देशालागून ।
करावी त्यांची कशी गणती ॥ गावी हो त्यांची किती महती ।
पूर्वजांची तारीफ करावी किती ॥
जिथें तिथें अलौकिक गुण । पराक्रम ज्ञान । बघुन स्वाभिमान ।
पूर्वजांना आनंद लई झाला ॥ दिला त्यांनीं आदेश लोकांना ।
बाप हो करा उत्सवाला ॥

(चाल) उत्सवाच्या निमित्तानें यावें एका जाग्याला ॥
सांगावें एकानें आपलें दुःख दुसऱ्याला ॥
दुसऱ्यानें झटावें तें दुःख दूर करण्याला ॥
स्नेहाचा लेप लावावा त्याच्या जखमेला ॥
सहकार परस्परामंदि पाहिजे वाढला ॥
देशाच्या उन्नतिचा विचार मिळावा लोकांनला ॥
लोकांत गुणांचा साठा पाहिजे झाला ॥

(चाल) असा विचार करुनी चित्तीं । दिला आदेश लोकांप्रती ॥
जी जी दिसेल तुम्हांला व्यक्ती । जिचा प्रभाव लोकांवरती ॥
जिच्या शौर्याची कीर्ति दिगंतीं । जी असेल ज्ञानाची मूर्ति ॥
पडूं नये तिची विस्मृति । म्हणुन साजरी करा तिची तिथि ॥
उपदेश पडे कानांवरती । साजऱ्या होती जयंत्या किती ॥
प्रचारांत पुण्यतिथि येती । त्याची किती करावी गणती ॥
(किती वर्णूं लोकांची भक्ति ॥)

(चाल) असे कितीक दिवस चालले । साजरे झाले उत्सव चांगले ।
लोक परी गेले (पार) विसरून ॥ सणांच्या मागील चैतन्य ।
(व्रतांच्या मागील चैतन्य ।) त्यामुळें निर्जीव झाले सण ॥

(चाल) कशी आली सणांची दुर्दशा सांगतो तुम्हांला ॥ (२)
देऊनी लक्ष रादांनो ऐका कवनाला ॥
एखादा उत्सव पातला। गोड धोड करती अन्नाला।
श्रीखंड-पुरी, बासुंदी किंवा जिलबीला ॥
पुरणपोळी, बुंदीचे लाडू, साखरभाताला ॥
अन्नावर ताव माराला (अन्नावर डावा हात माराला!)
करकरुनी आग्रह फार घालती जेवण्याला ॥
लांडग्यावाणी आधाशीपणे खाती अन्नाला ॥
बघा मांजरावाणी जांभया येती समयाला ॥
जड केलं किती जेवणाला। असं म्हणतो जो तो दुसऱ्याला।
(पण) खातांना विचार नाही आला ! ॥ की जपून करावं जेवणाला।
ना तर खणं खातं आपणाला। फिरविती हात पोटाला !
अजगरावाणी मग सुस्त धरणीला पडला ! ॥
पोटाला त्रास फार झाला। अजीर्णानं बेजार झाला।
धांव मारतो दवाखान्याला। काय बोलं वैद्यराजाला।
काय बोलं डॉक्टर साहेबाला। एकावं देऊन ध्यानाला।
पोट दुखीनं डॉक्टर जीव बेजार झाला ॥
कांही तरी तांतडीचा इलाज करावा याला ॥
डॉक्टरानं दिलं औषध कडू प्यायाला ॥
डोळे मिटून, नाक धरून, पिऊ लागला ॥
जेवतांना गोड जेवण विचार नाही केला ॥
म्हणुन आतां असा प्रसंग त्याच्यावर आला ॥
डॉक्टरचीं बिलं भरतांना भंडावुन गेला ॥

(चाल) अशा पितो हकीगतीला। सांगु तुम्हांला। साऱ्या लोकांला।
पडली बघा केवढी मोठी भूल ॥ विसराले उत्सवांचे मूळ।
(विसराले उत्सवांचें मोल।) म्हणुन असा उत्सवांचा
खेळ ! ॥

(चाल) होते जितके आपुले लहान-मोठे उत्सव ॥
आज परी राहिला नाही त्यामधे जीव ॥
उत्सव अलौकिक आपल्या राष्ट्राची ठेव ॥
उत्सवांचे ज्ञान कोणाला आज नाही अवं ॥

(चाल) ते ज्ञान करून देण्यास । आपल्या समाजास । आजच्या समयास (परकेस) । पाहिजे कोणी तरी पुढे आला ॥ असा विचार चित्तामधि भरला । पोवाड्याला आकार कधी आला ॥

(चाल) विघ्नहर्त्या एकदंताचे करुनी स्मरण ॥
सरस्वती ज्ञानदेवीला करून वंदन ॥
दूरदर्शी आपल्या पूर्वजांना अंतरी स्मरुन ॥
व्हावे यथाशक्ति हातून लोकजागरण ॥
चुकवावे थोड्या अंशाने देशाचे ऋण ॥
पूर्वजांच्या पराक्रमाचे करून वर्णन ॥
लोकांचा करावा आपण जागा अभिमान ॥
द्यावी जाणीव लोकांना आपण कुठले? कोण? ॥
भारून टाकावी मने देशप्रेमाने ॥
असा विचार करून चित्तात गातो मी कवन ॥
साथीला ढोलगं आणि डफ, झांज, तुणतुण ॥
गुरु महादेवाच्या चरणी माथा टेकून ।
काव्य-पुष्प वसन्तराय शाहीर करतो अर्पण ॥

(चाल) गुरुकृपा जरि लाभेल । तरीच मग मोल । विद्या पावेल । सफल कवणी नाही तर खास ॥ शाहिरी दीक्षा द्यावी शिष्यास । वसन्तराय विनवी महादेवास ॥

(रचना १२.३.१९५५
ते २३.३.१९५५) ——xox——